02-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/01/2025 10:40 PM Page 1



# कचरा रस्त्यावर टाकणाऱ्यांवर होणार कारवाई !

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : कारापूर - सर्वण पंचायत इमारतीचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १** : गोवा राज्यात ग्रामीण गावातील प्रत्येक भागाचा विकास होणे हे माझे स्वप्न असून गावातील लोकांनी केंद्र व राज्याच्या योजनांचा प्रत्येक घरात लाभ मिळावा यासाठी पंचायत सदस्यांनी कार्यरत राहावे. कचरा व्यवस्थापनाबाबत खूपच बेजबाबदारपणा चालू असून यापुढे योग्य ती कारवाई केली जाईल, असा इशारा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिला.

कारापूर - सर्वण पंचायतीच्या इमारतीचे उद्घाटन मुख्यमंत्री डॉ. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी आमदार प्रेमेंद्र शेट, सरपंच तन्वी सावंत, उपसरपंच दिव्या नाईक, अपर्णा देवी राणे, जिल्हा सदस्य महेश सावंत, गटविकास अधिकारी ओकार मांद्रेकर, पंच दामोदर गुरव, सचिव महादेव नाईक, सर्व पंचसदस्य आदींची उपस्थिती होती.



**कारापूर सर्वण : पंचायत इमारतीचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, प्रेमेंद्र शेट, तन्वी सावंत, अपर्णा देवी राणे व इतर.**

सरकार गावाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये खर्च करते. कारापूर भागात शेतीसाठी पाणी उपलब्ध करण्यात आले आहे. मात्र, त्या ठिकाणी अनेक भागात प्लास्टिकचा थर दिसतो. तसेच अनेक भागात सार्वजनिक ठिकाणी कचरा पडलेला असून पंचायत मंडळ, पंचायत सदस्यांनी त्याची जबाबदारी घेणे गरजेचे आहे.

स्वयंपूर्ण गोवा साकारायचे असेल तर विविध खात्यातील लोकांनी सरकारी कर्मचाऱ्यांनी सामाजिक भान ठेवून काम करणे गरजेचे आहे. दुर्दैवाने, काही खात्यातील कर्मचारी कामच करत नाहीत. त्याचा तपशील आम्ही गोळा केलेला असून आता तरी सुधारा व जनतेसाठी काम करा. गरज पडल्यास लोकांच्या घरी जाऊन त्यांना मदत करा पण कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आमदार प्रेमेंद्र शेट यांनी विकासाला गती देत सर्वच भागात वीज पाणी, रस्ते, भूमिगत वाहिन्या, पायाभूत सुविधा आदींसाठी कोटींची तरतूद केल्याचे सांगितले. कारापूर येथे भव्य क्रीडा संकुल उभारणार, असेही ते म्हणाले.

स्वागतपर भाषणात सरपंच तन्वी सावंत यांनी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांना सहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन केले. सर्वांनी विकासात सहकार्य करावे, असे आवाहन केले. बारा हजार चौरस मीटर जागेत भव्य क्रीडा संकुल उभारावे, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी सहा वर्षे मुख्यमंत्री म्हणून यशस्वी कामगिरी केल्याबद्दल डॉ. सावंत यांचा सत्कार करण्यात आला. अपर्णा देवी राणे यांनी पंचायत इमारतीसाठी जागा दिली, त्याबद्दल त्यांचा मुख्यमंत्री डॉ. सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कोळंम तलाव पर्यटन केंद्र म्हणून विकसित करणार असल्याचे तसेच या ठिकाणी भव्य क्रीडा संकुल उभारणार, अशी माहिती आमदार शेट यांनी दिली.

पान १ वरून

### स्मार्ट सिटीच्या रखडलेल्या कामांवर काँग्रेस, आप आक्रमक

झालेले नाहीत. भाजपने पणजीला मूक शहर बनवले आहे. हा जवळपास १४०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे. सरकारने नागरिकांना या निधीच्या वापराची स्पष्ट माहिती द्यावी. लवकरच, पावसाळ्यात याचा परिणाम स्पष्टपणे दिसून येईल, असे पालेकर म्हणाले.

आपचे उपाध्यक्ष वाल्मिकी नाईक यांनीही सरकारी कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.सात वर्षांपासून हा प्रकल्प सुरू आहे, पण शहरात कुठेही अभियंते किंवा पर्यवेक्षक दिसत नाहीत. १४०० कोटी रुपये खर्च करून प्रत्यक्षात नागरिकांना काय लाभ मिळणार आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पणजीतील रहिवाशांचे जगणे या अपूर्ण प्रकल्पांमुळे कठीण होत आहे. रखडलेल्या कामांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत आणि पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. आगामी पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता असून, सरकारने तातडीने यावर तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# साईशा शेट शिरोडकरची कोंकणी कवितेत भरारी

पटकाविला काव्यसृजनचा चषक

टीम दैनिक हेराल्ड



केपे, दि. १ : काव्यसृजन या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे येथील कोंकणी विभागातील एम.ए.भाग एकची विद्यार्थिनी साईशा शेट शिरोडकर हिने प्रथम क्रमांक पटकावत मानाचा काव्यसृजन चषक पटकाविला.कोंकणी सरस्पत मंडळ, शणै गोंयबाब साहित्य आणि भाषा महाशाळा गोवा विद्यापीठ यांच्यावतीने शंकर रामाणी आठवणीप्रित्यर्थ सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या तिच्या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, कोंकणी विभाग आणि शिक्षक यांच्यावतीने अभिनंदन करण्यात आलेले आहे.

साईशाला लहानपणापासूनच कवितेची आवड असून माध्यमिक स्तरापासूनच विविध काव्यवाचन स्पर्धांमध्ये तिने भाग घेत मातब्बर स्पर्धा जिंकत आपल्या नावाचा दबदबा कोंकणी कवितेत निर्माण केलेला आहे. २०२० ते २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीत तिने असंख्य कोंकणी काव्यवाचन स्पर्धा जिंकलेल्या आहेत. गोमन्त शणै गोंयबाब सेवा केंद्र, (२०१९) कला असोसिएशन मडगाव,(२०२०) पार्वतीबाई चौगुले महाविद्यालय, कोंकणी विभाग, (२०२२) सीईएस महाविद्यालय कुंकळ्ळी काव्यतरंग (२०२३) कार्मेल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नुवे गोवा (२०२३), यांसारख्या असंख्य कोंकणी काव्यवाचन स्पर्धा जिंकत कोंकणी कवितेत स्वत:चे नाव निर्माण केलेले आहे.

# अनिरुद्ध जोशींच्या गायनाने म्हापसावासीय मंत्रमुग्ध

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १** : महाराष्ट्र संगीत रत्न - सह्याद्री वाहिनी विजेता, सारेगमप - झी मराठी विजेता, सूर नवा ध्यास नवा - कलर्स वाहिनी विजेता अनिरुद्ध जोशी यांचा गाणे मनातले..... हा कार्यक्रम नुकताच म्हापसा टॅक्सी स्टॅण्ड येथे पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन म्हापसा शिगमोत्सव मंडळाने, पर्यटन खाते- गोवा सरकार आणि म्हापसा नागपालिका यांच्या सहकार्याने केले होते. यावेळी अनिरुद्ध जोशी यांना गोव्याची तरुण गायिका गौतमी हेदे - बांबोळकर यांची उत्तमसाथ लाभली. यावेळी एका पेक्षा एक सरस भक्तिगीते, मराठी व हिंदी चित्रपटगीते दोघांनी सादर करून उपस्थित प्रेक्षकांना रिझवले.

# नव्या पिढीसाठी सांस्कृतिक मूल्ये जपा

विश्वनाथ जोशी : चित्पावन ब्राह्मण संघाचा वर्धापनदिन उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १** : ब्राह्मणांनी आपली संस्कृती जपण्यासाठी गुरू होण्याची गरज असून नव्या पिढीसाठी आपले आचार-विचार व संस्कार टिकवून ठेवताना सांस्कृतिक मूल्ये जपावीत. आपल्या हिंदुत्वाचा सार्थ अभिमान बाळगत मार्गक्रमण करावे, असे विश्वनाथ जोशी यांनी सांगितले.

चित्पावन ब्राह्मण संघ गोमंतक (कुळण सर्वण )च्या स्थापना वर्धापनदिनानिमित्त न्यातीतील विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या व्यक्तींचा सत्कार व सन्मान सोहळा



**सर्वण : सत्कारमूर्तीसह विश्वनाथ जोशी, अध्यक्ष दीपक मराठे, प्रशांत वझे, प्रसाद मराठे व इतर.**

देवी योगेश्वरी मंदिर सभागृहात झाला. यावेळी जोशी बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे अध्यक्ष दीपक मराठे, प्रसाद मराठे, प्रशांत वझे, धनंजय मोने, रामकृष्ण सोमण आदी उपस्थित होते.

दीपक मराठे यांनी स्वागत पर भाषणात संस्थेच्या कार्याची माहिती दिली. अनेक उपक्रम हाती घेतले असून ज्ञाती बांधवानी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी ज्ञातीतील विविध क्षेत्रात योगदान दिलेले शिवराम वझे (मये), विष्णू जोशी (बांबर), शैलजा जोशी (साखळी), अन्नपूर्णा मराठे (चिरेव्हाळ), उल्हास जोशी (वास्को) यांचा प्रमुख पाहुणे विश्वनाथ जोशी, अध्यक्ष दीपक मराठे आदींच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच कीर्तनकर विवेक जोशी (वाळपई), सुहासबुवा वझे (बोरी)यांचा सन्मान करण्यात आला.

पूजा व हेमा मराठे यांनी स्वागतपर गीत सादर केले. सूत्रसंचालन प्रसाद मराठे तर धनंजय मोने यांनी आभार मानले. ज्ञाती बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वोत्तम प्रयत्नामुळेच मिळते उज्ज्वल यश..!

डॉ. आवर्तानो बॅरेटो यांचे प्रतिपादन; केपे सरकारी महाविद्यालयात बक्षीस वितरण सोहळा

टीम दैनिक हेराल्ड

**केपे, दि. १** : विद्यार्थ्यांनी यश मिळवायचे असेल तर सुरुवातीला ध्येय निश्चित करावे. त्यानंतर ध्येय गाठण्यासाठी समर्पित भावनेने प्रयत्न करावेत. कारण सर्वोत्तम प्रयत्नामुळेच उज्ज्वल यश मिळू शकते, असे प्रतिपादन गोवा विद्यापीठाचे माजी क्रीडा अधिकारी आणि डॉन बॉस्को अभियांत्रिकी महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आवेर्तानो बॅरेटो यांनी केले.


**केपे : प्रमुख पाहुणे डॉ. आवेर्तानो बॅरेटो, सन्मानीय पाहुणे सुधाकर नाईक, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर, डॉ. राजन मॅथ्यू व मान्यवर.**

कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे येथील क्रीडा विभागार्ते आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी मंचावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर, सन्माननीय पाहुणे दामोदर वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा संचालक सुधाकर नाईक, केपे सरकारी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण आणि क्रीडा संचालक डॉ. राजन मॅथ्यू आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर यांनी केले. प्रा.तबस्सुम यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. राजन मॅथ्यू यांनी केपे सरकारी महाविद्यालयाच्या क्रीडा कामगिरीवर प्रकाश टाकला. त्यानंतर विविध क्रीडा स्पर्धेत देदीप्यमान कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

केपे सरकारी महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच महाविद्यालयाने क्रीडा विभागात ऐतिहासिक घोडदौड केलेली आहे, आंतरमहाविद्यालयीन खेळामध्ये वेगळी छाप पाडलेली आहे, असे आपल्या मनोगतात प्राचार्या प्रवीणा केरकर म्हणाल्या.

आंतरवर्गीय स्पर्धांमध्ये एफवायबीएला सांघिक अजिंक्यपद आणि एसवायबीएला सांघिक उपविजेतेपद. महिलांमध्ये सांघिक अजिंक्यपद एसवायबीएला तर उपविजेतेपद एफवायबीएला देण्यात आले.परशराम घाडी सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड आणि सिया नाईक सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून निवड करण्यात आली.

दीपा प्रजापति यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.क्लेन्सी परेरा यांनी आभार मानले.

**व्यायामाने सुटतील आरोग्याच्या समस्या : नाईक**

तंदुरुस्त राहण्यासाठी आणि आरोग्य समस्या टाळण्यासाठी दररोज व्यायाम करणे आवश्यक आहे. चांगल्या आरोग्याच्या विकासासाठी तंदुरुस्ती अत्यंत महत्त्वाची आहे, असे सुधाकर नाईक यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी संस्कृती रक्षणात संशोधनात्मक कार्य करावे

उपसंचालक माटे : हरमलात लोकनाट्य महोत्सव साजरा

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १ : गोव्याच्या विविध भागात अनेक रूढी, परंपरा नित्य चालू असतात. काही भागातील संस्कृतीची डॉक्युमेंट्री केली आहे. संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक कार्य करून संस्कृतीचे संवर्धन करण्याची गरज आहे, असे कला संस्कृती खात्याचे उपसंचालक मिलिंद माटे यांनी सांगितले.




कला संस्कृती संचालनालय व हरमल पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गोमंतकीय लोकनाट्य महोत्सवाच्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर महोत्सवाचे संयोजक प्रा डॉ दुर्गेश माजीक व कॉलेजचे प्रशासक प्रा उदेश नाटेकर उपस्थित होते.

यावेळी श्री सातेरी रणमाले पथक झर्मे सत्तरी यांचे स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. प्रशासक प्रा. नाटेकर यांच्याहस्ते उपसंचालक माटे यांना स्मृतिचिन्ह देण्यात आले. या सोहळ्याचे सूत्रनिवेदन शिक्षक नवसो परब यांनी केले व त्यांनीच आभार मानले.

या लोकनाट्य महोत्सवात पालये श्री रवळनाथ सांस्कृतिक संघ (ढोलक भजन), श्री माही मंडळ,जर्मे यांचे (कालो दशावतार), श्री गोपाळकृष्ण कला संगम प्रियोळ यांचे (जागोर) सादर करण्यात आले. यावेळी रंगमंचावर चूडतांची तसेच घोडेमोडणी सजावट केली होती. या महोत्सवात पर्वरी, म्हापसा, पणजीतील महाविद्यालयाची विद्यार्थी सहभागी झाले होते.


**IN THE COURT OF MAMLATDAR OF BARDEZ AT MAPUSA, GOA**

Case No. MAM / TNC / DEC / TIV / 26 / 2024

1. Mr. Laxmikant Rohidas Bhonsle, Son of late Rohidas Jagannath Bhosle 2. Shaila Bhosle alias Shaila Kotkar, Both r/o H. No. 1170, Mazalwaddo, Anjuna, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Antona Concesaio Pereira, r/o Madel Tivim, Bardez, Goa 2. Mr. Joquim S. Pereira, r/o Madel, Tivim, Bardez, Goa ....Opponents

PUBLICATION NOTICE

Whereas the applicants above named has made an application dated 07.10.2024 under section 7 & 14 of the Goa Daman and Diu Agricultural Tenancy Act 1964 for declaration with regards to property surveyed under Sy. No. 122/26 admeasuring area 325 sq. mts situated at Tivim, Bardez, Goa in this Court against you.

And whereas the applicant by application dated 14.1.2025 informed that the notice issued to opponent through registered A.D. However the notices are returned unserved with the postal remark "Insufficient addresses" and that the applicant is not aware of any other addresses of the said opponent and it is therefore prayed for substitute service to the said opponent and their heirs by way of publication in daily newspaper.

Now therefore, notice is hereby given to you under Order V of Rule 20(1)A of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by duly authorization on **8/4/2025** at **10.30 a.m.** to answer the claim.

Take notice that, in default of your appearance as aforesaid on the date and time mentioned above, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 01st day of April 2025.

Sd/- Anant R. Malik
Mamlatdar of Bardez Taluka
Mapusa, Goa
Seal

**IN THE COURT OF MAMLATDAR OF BARDEZ AT MAPUSA, GOA**

Case No. MAM / TNC / PUR / PIRNA / 1 / 2024

1. Smt. Yamunabai Anant Chodankar (since deceased through her Lrs) 2. Shri Krishna Anand Chodankar (since deceased Bechlor) 3. Shri Pandharinath Anant Chodankar), s/o late Anant Chodankar 4. Shri. Ashok Anant Chodankar, All r/o H. No. 2/A, Dhakli Chandai 5. Shri Sham Anant Chodankar (deceased Bachelor) .....Applicants

V/s

1. Smt. Shantabai Ganpat Mahambre, r/o Lamgao, Bicholim, 2. Shri Raghuvir Vishwanath Mahambre 3. Shri Vithal Ladu Mahambre 4. Shri Shambu Vaman Mahambre 5. Shri Trimbak Vitha Mahambre, Opp No. 2 to 5, r/o Aldona, Bardez, Goa ....Opponents

NOTICE

To, The Applicants / Opponents

Whereas the applicant above named has made an application dated 24.10.2024 u/sec 18-C of Agricultural Tenancy Act for purchase of field in Survey No. 10/2 admeasuring an area 960 sq. mts and property bearing Sy. No. 16/0 admeasuring an area 675 sq. mts situated in Pirna Village in this Court against you.

And whereas the applicant by application dated 24.3.2025 informed that the notice issued to opponent through registered A.D. However the notices are returned unserved with the postal remark "Insufficient address & party out of station" and that the applicant is not aware of any other addresses of the said opponent and it is therefore prayed for substitute service to the said opponent and their heirs by way of publication in daily newspaper.

Now therefore, notice is hereby given to you under Order V of Rule 20(1)A of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by duly authorization on **24/4/2025** at **10.30 a.m.** to answer the claim.

Take notice that, in default of your appearance as aforesaid on the date and time mentioned above, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 01st day of April 2025.

Sd/- Anant R. Malik
Mamlatdar of Bardez Taluka
Mapusa, Goa
Seal

**IN THE COURT OF MAMLATDAR OF BARDEZ AT MAPUSA - GOA**

Case No.: MAM/TNC/ DEC/CAL/03/2025

1. Mr. Chandracanta Shanker Govencar @Chandracanta Xencora Goencar @Chandrakant Shankar Govenkar @Chandrakant Shanker Govenkar @Govekar @Govecar, Son of late Xencora Loximona Goencar @Shankar Govenkar @ Govekar @ Govecar, Major of age, widower, Occupation: Farmer, Resident of H.No.4/267, Prabhu Vaddo, Calangute, Bardez-Goa, 403516 2. Mr. Dasharath Chandrakant Govekar @Dasharath Chandracanta Govenkar, Son of Chandrakant Shankar Govekar @Chandracanta Shankar Goenkar,3. Mrs. Dikshita Dasharath Govenkar @ Govekar, Wife of Mr. Dasharath Chandrakant Govekar @Dasharath Chandracanta Govenkar, Age:52 years, married, Occupation: Farmer, Both resident of H.No.4/267/C, Porba Vaddo, Calangute, Bardez-Goa, 403516, 4. Mr. Devanand Chandracanta Govencar @Govenkar @Devanand Chandrakant Govekar, Son of Chandracanta Shanker Govencar @Chandrakant Shankar Govekar, 5.Mrs. Preeti Devanand Govencar @Govenkar @Govekar, Wife of Mr. Devanand Chandracanta Govencar @Govenkar @Govekar, Both resident of H.No.4/267 A, Prabhu Vaddo, Calangute, Bardez, Goa, 403516, 6. Mr. Vishwas Chandrakant Govecar @Govenkar @Govekar, Son of Chandrakant Govecar Chandracanta Shanker Govencar @ Chandrakant Shankar Govekar, 7. Mrs. Sujata Vishwas Govecar @ Govekar @Govenkar, Wife of Mr. Vishwas Chandrakant Govecar @Govenkar @ Govekar, Age:37 years, Occupation:Farmer, Married, Both resident of H.No.4/267, VTC:Calangute, Bardez, Goa, 403516. ...Applicants

V/s

1. Miss. Maria Andrew D'Souza, Major of age, Resident of Saligao, Bardez-Goa ...Opponent

PUBLICATION NOTICE

To, The Opponent.

Whereas the applicant above named has made an application dated 27/12/2024 under section 7 of the Goa Daman & Diu Agricultural Tenancy Act 1964, for declaration with regards to property Surveyed under Sy. No. 452/2, 452/4, 452/8, 452/9 & 452/12 situated at Calangute, Bardez Goa, in this court against you.

And Whereas the applicant by application dated 15/2/2025 informed that the notice issued to opponent through Register A.D. However the notice is returned unserved with the postal remark "NO Such person in the adress" and that the applicant is not aware of any other addresses of the said opponent and it is therefore prayed for substitute service to the said opponent and their heirs by way of publication in daily newspaper.

Now therefore, notice is hereby given to you under Order V of Rule 20(1)A of the C.P.C. 1908 to appear before this Court either in person or by duly authorization on **29/4/2025 at 3.00 p.m.** to answer the claim.

Take notice that in default of your appearance as aforesaid on the date and time mentioned above, the application will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 1st day of April, 2025.

Sd/- (Anant R. Malik)
Mamlatdar of Bardez Taluka,
Mapusa - Goa.
SEAL

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given it to the general public that my client is desires of purchasing a property described in the schedule hereunder from **Ms. BARBARA LALITA D'SOUZA alias BARBARA LALITE D'SOUZA alias BARBARA GRANQVIST** daughter of Late Anthony D'Souza, aged 63 years, divorcee, housewife / service, Indian National, resident of H.No. 459, Gamma Vaddo, Parra, Bardez, North Goa 403507, Sweden Address - Djurgårdsgatan 10 Lgh 1305 414 62 göteborg Gothenburg, Sweden.

Therefore by this public notice people at large are made known that if any person having any right, title, interest, claim or demand whatsoever in respect of the Property described in Schedule or any portion thereof, by way of sale, exchange, mortgage, charge, lien, gift, trust, inheritance, bequest, possession, lease, tenancy, lis pendent, maintenance, easement or under any memorandum of understanding, agreement for sale or development agreement or power of attorney, option, right of first refusal or pre-emption or otherwise howsoever, is hereby required to notify the same in writing (with notarized documents) to the undersigned ***within 15 (fifteen) days*** from the date of this notice, failing which the right etc. will be considered as knowingly waived and we will proceed to finalized the sale with the owners.

SCHEDULE
(DESCRIPTION OF THE PROPERTY INTEND TO PURCHASE)

ALL THAT immovable property known as **"COLOMBATULY"** or **"GORBATA"**, situated in the Village of **Parra**, within the jurisdiction of Village Panchayat of Parra, Taluka and Sub District of Bardez, District of North Goa, State of Goa, which property described in the Land Registration Office at Bardez under No. 5043 at 245v of Book B 34 old but not found enrolled in the Taluka Revenue Office of Bardez, however surveyed under Old Cadastral No. 2079, which corresponds to present Survey No. **219/20** of Village Parra, Bardez, Goa, along with the house bearing house no. 459, admeasuring 225 square meters and is bounded as under:-

North: By property bearing Survey No. 219/4-B (partly) and 10 (partly); South: By property bearing Survey No. 219/19 (partly), 26 and 27;East: By property bearing Survey No. 219/21; West: By property bearing Survey No. 219/19.

Sd/- Adv. Gajanan K. Korgaonkar
Off: 315/316, Cosmos Centre, 3rd Floor
Morod, Mapusa, Bardez - Goa

**OFFICE OF THE VILLAGE PANCHAYAT MAJORDA UTORDA CALATA.**

Majorda, Salcete- Goa 403 713
Email: vpmajordautordacalatal@gmail.com
Mob: 9325953161
No. VP/MUC/Quot.file/2025-26/08
Date: 01/04/2025

QUOTATION NOTICE

Village Panchayat Majorda- Utorda-Calata invites Sealed quotations for door to door plastic waste collection once a week in all 09 wards in the jurisdiction of Majorda-Utorda-Calata and also collection of road side plastic garbage from all 09 wards from **12th April 2025 to 31st March 2026** from Goa Waste Management registered contractor having authorized MRF facilities of their own the registration certificate from Pollution Control Board shall be enclosed along with previous work done.

(1) Collecting of plastic waste door to door of V.P. Majorda-Utorda-Calata once a week and to transport the same at the designated site at Goa Waste Management Corporation at Saligao.

(2) Collection of Plastic waste at road sides 3 (three) times a week in the jurisdiction of V.P. Majorda- Utorda-Calata and to transport the same at the site at Goa Waste Management Corporation at Saligao.

Quotation should reach to this office on or before 11/04/2025 upto 11.00 a.m. and same will be opened on the same day at 12.30 p.m. in presence of quotation holders and V.P. members if any.

The Panchayat reserves the right to accept or reject any or all the quotations received without assigning any reason thereof.

(Anthea Lynn Pereira)
Sarpanch
V.P. Majorda-Utorda-Calata.
SEAL

**IN THE COURT OF THE MAMLATDAR OF PONDA TALUKA, PONDA GOA.**

Case No. Mam/Mund/C1/Querim/8/21

1.Harichandra Yeshwant Gaude R/o. H.No.A-60, Amarkhane, Keri- Ponda Goa. ...Applicant

V/s

1. Communidade of Querim Through its Attorney Office at Querim, Ponda - Goa. 2. Administrator of Communidade, Communidade building. Near Civil Court, Mapusa Bardez Goa. ...Respondents.

Public Notice to
The Respondent 1

PUBLIC NOTICE

WHEREAS the above named applicants have filed an application U/S 8A of the Goa Daman & Diu Mundkar Protection from Eviction Act 1975.

AND WHEREAS the notice sent to the above mentioned Opponent no.1 are returned back unserved with the endorsement **"Not known"**. It is reported by the applicant that they are unaware of the anyother addresses of the opponent.

AND WHEREAS after considering the case of the applicants the Court come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the local newspaper.

Therefore notice is hereby given to the above mentioned respondent to appear in this court on 9/4/2025 at 10.30 a.m. alongwith material evidence on which they wish to rely upon in person or through duly authorized agent failing which order shall be passed and the matter will be decided in your absence.

Given under my hand and seal of this Court on this the 25th day of March, 2025.

Sd/- (Bhiku L. Gavas)
Mamlatdar of Ponda Taluka
Ponda Goa.
SEAL

**IN THE COURT OF THE JUDICIAL MAGISTRATE, FIRST CLASS, 'A' COURT AT PONDA GOA**

Cri. Case No.295/OA/NIA/2022/A

Mr. Mohammed T. Shingeti ....Complainant.

V/s

Mrs. Naazia Y. Armár ....Accused

FORM No. 4
PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED
[SEE SECTION 82 OF Cr. P.C.]

WHEREAS, complaint has been made before me that **Accused Mrs. Naazia Yasmeen Armar w/o. Shri. Nazim Sheikh r/o. House No. 5-D-3, Armaz, Kurtarkar Nagari, Ponda- Goa,** has committed [or is suspected to have committed] the offence punishable **under Section 138 r/w sec 142 of NI Act 1881** and it has been returned to a warrant thereupon issued against the said **Accused Mrs. Naazia Yasmeen Armar** cannot be found, and whereas it has been shown to my satisfaction that the said **Accused Mrs. Naazia Yasmeen Armar** has absconded [or is concealing himself to avoid the service of the said warrants];

PROCLAMATION is hereby made that the said **Accused Mrs. Naazia Yasmeen Armar w/o. Shri. Nazim Sheikh r/o. House No. 5-D-3, Armaz, Kurtarkar Nagari, Ponda-Goa,** is required to appear before this Court to answer the said complaint within 30 days from this date. The case is fixed for hearing **on 12.05.2025 at 10.00 a.m.**

Dated this 26th day of March, 2025.

Judicial Magistrate First Class, 'A'
Court, Ponda-Goa.
SEAL

**VILLAGE PANCHAYAT MANDREM**
Mandrem Pernem Goa

Ref. No. VP/MAN/PER/Gram Sabha / 2024-2025/4552 Date: 27/03/2025

GRAM SABHA MEETING NOTICE

All the members of the Gram Sabha whose name as for time being entered as electors in the electoral roll of this Panchayat are hereby informed that Gram Sabha meeting of Village Panchayat Mandrem shall be held on **6th April 2025 at 10:00 a.m.** in the premises of Panchayat Hall of Mandrem.

**The following business will be transacted in the Gram Sabha meeting.**

1. To read and confirm the proceedings of the last Gram Sabha meeting.
2. To approve beneficiaries under Government if any.
3. To discuss on various Development works.
4. To discuss and decide on the proposals received from public/Gram Sabha members.

Any other proposals/suggestion which a person desires to place before the Gram Sabha meeting may be sent by him/her to the Sarpanch on or before **02/04/2025 up to 1:00 p.m.** if there is no quorum the meeting will be adjourned and the adjourned meeting will be held after an hour on the same day for the said agenda.

Members of the Gram Sabha are requested to attend the Gram Sabha meeting.

Sd/- ( Shri. Rajesh Mandrekar )
Sarpanch,
V. P. Mandrem.
Seal